स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करीता सादर

संशोधन आराखडा

अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन

(२०१०-११-२०२०-२१)

संशोधक

गडपवार प्रियंका हनमंतराव

एम. ए. अर्थशास्त्र (सेट)

मार्गदर्शक

डॉ. स्मिता कोंडेवार

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

कै. व्ही.के काळे वरिष्ठ महाविद्यालय,नांदेड.

संशोधक केंद्र

पीपल्स महाविद्यालय,नांदेड.

जानेवारी -२०२४

प्रस्तावना :**(Introduction)**

देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राला विशेष स्थान आहे. अनेक विकसित देश कृषि विकासाच्या पायरीवर चढूनच आर्थिक विकासाच्या शिखरावर पोहचलेले आहेत. अर्थतज्ञ केने यांच्या मतानुसार 'कृषि ही कोणत्याही राष्ट्राच्या संपत्तीचा स्त्रोत आहे व कृषि क्षेत्रातील अधिक्य हे राष्ट्राच्या विकासासाठी अनुकूल गोष्ट आहे' सध्या जगातील दोन तृतियांश लोकांचा व्यवसाय शेती आहे. इंग्लड रशिया, जपान, जर्मनी इत्यादी विकसीत राष्ट्रांच्या आर्थिक विकासात कृषि क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.

मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये कृषि क्षेत्र मानवाच्या उदरनिर्वाहाचे एक प्रमुख साधन मानले जाते. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या मते 'शेती हा मानवी संस्कृतीचा सर्वात मोठा शोध आहे.' प्रा. मुकूंद गायकवाड यांच्या मते मानवाच्या सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक, विकासाचा पाया कृषि आहे. जरी सद्यःस्थितीला जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक विकास वेगाने होत असला; तरी सुध्दा बहुसंख्य लोकांच्या जीवनाचे शेती हेच एकमेव साधन मानले जाते. ही गोष्ट कृषि क्षेत्राचे महत्व स्पष्ट करते.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत व आर्थिक विकासात कृषि क्षेत्राचे किती महत्व आहे याबाबत विविध अर्थतज्ञांनी आपली मते मांडली आहेत. प्रा. रॅग्नर नर्क्स या अर्थतज्ञाने समतोल विकासाचे तत्व विषद करताना असे नमूद केले आहे की, 'सर्वसाधारण आर्थिक प्रगतीसाठी शेतीचा विकास आवश्यक आहे.' ॲडम स्मिथ यांनीदेखील संपत्तीच्या उत्पादन कार्यात कृषि क्षेत्राला स्थान दिले आहे. त्याचप्रमाणे विल्सन, बार्कर, बारसोडी इत्यादींच्या मते 'शेती हे अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र आहे' थोडक्यात असे म्हणता येईल की कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासात शेतीचे योगदान सर्वश्रेष्ठ नसले तरी महत्वाचे निश्चितच आहे.

अल्पविकसित व विकसनशील देशामध्ये भांडवलाची कमतरता असते. प्रा. लायबेन्स्टाईन यांच्या मते "विकसनशील अर्थव्यवस्थेत भांडवलनिर्मिती कमी असते. कारण अर्थव्यवस्थेत दारिद्र्य असते, व दारिद्र्य असण्याचे कारण कमी भांडवलनिर्मीती आहे. हे दृष्टचक्र भेदल्याशिवाय खऱ्या अर्थाने आर्थिक विकास होऊ शकत नाही." यामूळे विकसनशील देशामध्ये ही भांडवलनिर्मीती कृषि क्षेत्रातून शक्य आहे. बचत हा भांडवलनिर्मीतीतील मुख्य घटक आहे. कृषि क्षेत्रातील उत्पादन वाढीमुळे बचतीत वाढ होऊन इतर क्षेत्रासाठी भांडवलनिर्मीती होऊ शकते. कारण शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी तुलनेने कमी गुंतवणूक करावी लागते व त्यातून इतर क्षेत्रासाठी भांडवलनिर्मीती होते. म्हणून शेतीचे उत्पादन वाढवून त्या क्षेत्रात बचतीला प्रोत्साहन देणे व ती बचत इतर क्षेत्रासाठी गुंतवणूक म्हणून वळविणे पूर्णपणे शक्य आहे. यादृष्टिने विकसनशील देशांची भांडवली कमतरतेची अडचण कृषि क्षेत्र सोडवू शकते.

कृषि क्षेत्र आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावतेच परंतु त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देते. कृषि क्षेत्राच्या विकास प्रकियेत तसेच रोजगारसंधीच्या निर्मीतीमध्ये तुलनेने कमी भांडवल लागते. यामूळेच विकसनशील देशात कृषि क्षेत्रातून जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि यातूनच लोकांची क्रयशक्ती वाढून एकूण मागणीत वाढ होते; व आर्थिक विकासाला चालना मिळते. या शिवाय रोजगार, उपभोग, बचत, कच्चा माल या विविध घटकाच्या अनुषंगाने कृषीला विशेष महत्व आहे. एकंदरीत आर्थिक विकासात कृषि क्षेत्राचे स्थान हे महत्वाचे मानले जाते.

भारतातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढ होत आहे. सुधारणोत्तर कालखंडात अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सरासरी धारणक्षेत्रात घट होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सरासरी उत्पादनात सरासरी घट, उपभोग, रोजगार, बचत,गुंतवणूक तसचे सामाजिक स्थिति या सारख्या घटकावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार

करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तूनलात्मक अध्ययन या विषयाची निवड करण्यात आली आहे.

अल्पभूधारक शेतकरी

भारतीय कृषि उत्पादन पध्दती श्रमप्रधान असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतकरी वर्गाला महत्वाचे स्थान आहे. या वर्गातीलच एक वर्ग म्हणजे सीमांत व अल्पभूधारक शेतकरी होय. भारतीय कृषि अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्वपूर्ण घटक म्हणून या वर्गाचा उल्लेख करता येईल. परंतु अल्पउत्पन्न, कर्जबाजारीपणा, कनिष्ठ राहणीमान, सामाजिक व आर्थिक मागासलेपणा इत्यादी कारणांमुळे सदयःस्थितीला अल्पभूधारक शेतकरी वर्ग दैन्यावस्थेत असून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आव्हान आज अर्थव्यवस्थेसमोर आहे.

महाराष्ट्र कर्ज निवारण कायदा १९७५ मधील कलम २ (म) नुसार "जो शेतकरी एक हेक्टरपेक्षा जास्त परंतु दोन हेक्टरपेक्षा कमी असलेली जमीन व्यक्तिशः कसतो तसेच वरील मर्यादे पर्यंत असलेली जमीन कसणारे कुळ किंवा बटाईदार हे अल्पभूधारक शेतकरी या व्याख्येत येतात.

सामान्य अर्थान सीमांत शेतकरी म्हणजे असा वर्ग की ज्यांचे धारणक्षेत्र एक हेक्टरपेक्षा कमी आहे आणि अल्पभूधारक म्हणजे असा शेतकरी की, ज्यांच्या धारण क्षेत्राची मर्यादा दोन हेक्टर आहे. चार हेक्टरपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश मोठे शेतकरी या गटात करण्याचे संकेत आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या धारणाक्षमताचा विचार करता असे दिसून येत की, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संख्या वाढ होत आहे.

सुधारणोत्तर कालखंडात भारतात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सरासरी धारणक्षेत्रात घट होत आहे. जागतिकीकरण व औद्योगिकरणामुळे शेतजमिनीला बिगर शेती उपयोगाकडे वळविले जात आहे. याचाच परिणाम धारणक्षेत्राच्या सरासरी आकारावर झाला आहे. आर्थिक धारणक्षेत्र कल्पनेच्या पार्श्वभूमीवर या सरासरी आकाराचा विचार करता भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेचे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मागासलेपणाचे एक महत्वाचे कारण स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकरी

अल्पभूधारक शेतकऱ्यांची राष्ट्रीय पातळीवर जी स्थिती आहे. तीच महाराष्ट्र राज्यात दिसून येते. महाराष्ट्रात देखील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढत असून त्यांच्या सरासरी धारणक्षेत्रात घट होत आहे. महाराष्ट्रातील धारणक्षेत्रे उत्तरोत्तर विभाजीत होत चालली आहेत. याचे मुख्य कारणे म्हणजे वाढती ग्रामीण लोकसंख्या, कौटूंबिक विघटन, रोजगाराच्या संधीचा अभाव हे आहेत. शेतीचे तंत्र विकसित नसताना अल्पभूधारकांच्या संख्येतील वाढ व धारणक्षेत्राचा घटता आकार यामुळे शेतीची उत्पादकता तर घटतेच परंतु याबरोबरच याचा दूरगामी परिणाम ग्रामीण कृषि अर्थव्यवस्थेवर होत आहे. सरासरी धारणक्षेत्राचा घटता आकार ही समस्या अल्पभूधारकांसमोर आहेच परंतु त्यांच्या निम्न राहणीमाणाला कारणीभूत असणाऱ्या विविध समस्या आज त्यांच्या समोर आहेत.

अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रश्न व शासनाची भूमिका

कोणत्याही क्षेत्राच्या विकासाला त्या क्षेत्रात उपलब्ध असलेले वातावरण, त्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या जाणिवा व दृष्टिकोन यांना महत्व असते. या दृष्टिकोनातून भारतीय अर्थव्यवस्थेतील अल्पभूधारक शेतक-यांकडे पाहिल्यास या वर्गाच्या सामाजिक, आर्थिक, रोजगार, उत्पन्न व उपभोग इत्यादी सबतीत जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या गटातील बहुसंख्य शेतकरी हे गरीब, निरक्षर, परंपरा व स्त्री यांनी जखदलेले, देववादी व स्थितीशील आहेत. सद्य:स्थितीला जागतिकीकरणाच्या पाश्र्वभूमीवर शतीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन व्यावसायिक स्वरुपाचा नसून उपजिवीकेचे साधन असा असल्यामूळे कृषि क्षेत्रातील आरिष्टाचा सर्वांत जास्त प्रभाव अल्पभूधारक शेतकऱ्यांवर पडत आहे.

भारतातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीतून पुरेसा रोजगार प्राप्त होत नाही. त्यामूळे त्यांची श्रमशक्ती माठया प्रमाणात वाया जात आहे. शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, बारामाही पाणीपुरवठ्याचे अल्प प्रमाण व शतीतील हंगामी स्वरुपाची कामे यामुळे बहुसंख्य अल्पभूधारक शेतकरी

वर्षातून बरेच दिवस बकार राहतात सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा वर्ग भारतीय कृषिव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जातो, यासाठी शासनाची भूमिका आणि आधुनिक शाश्वत विचारांच वार त्यांच्यापर्यंत पाहचत नाही तापर्यंत त्यांचा दृष्टिकोन बदलण अवघड आहे.

संशोधन विषयाची निवड (क्षेत्र निवड):Selection of Research Topic)

अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची एकूण संख्या लक्षात घेतली असता असे दिसून येते की, अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत्या लोकसंख्येमूळे वाढत आहे. अल्पभूधारक या वर्गाचे अर्थरचनेत महत्त्व अनन्यसाधारण आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करीत असतांना लक्षात येते की, यांना असणाऱ्या समस्यांची यादी खूप मोठी आहे. कृषि व्यवसायातून त्यांना शाश्वत उत्पन्न मिळत नाही; मिळालेल्या उत्पन्नाला योग्य भाव मिळत नाही, त्यावर निसर्गाचे संकट, पाण्याचे दूर्मीक्ष, जमिनीची ढासाळलेली प्रत, त्यातच शेतीचे होणारे तुकडीकरण, व्यापाऱ्याकडून होणारी पिळवणूक, कर्जबाजारीपणा यासारख्या असंख्य संकटांना सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. कृषि अर्थरचनेत महत्त्वाचे स्थान असलेल्या अशा वर्गाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करून त्यावर उपाय सूचविणे आवश्यक वाटते. म्हणूनच अल्पभूधारक शेतकरी यांच्या समस्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी " अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन " हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाचे महत्व: (Importance of Research)

भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान व ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताचे वर्णन नेहमी 'सुजलाम् सुफलाम् असे केले जाते. 'सुजलाम् सुफलाम् म्हणजेच नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेली भूमी होय. प्राचीन काळापासून भारतामध्ये भारताच्या सामाजिक व आर्थिक वाटचालीत कृषि क्षेत्राला महत्वाचे स्थान आहेउत्पन्नाचा मोठा स्त्रोत, रोजगाराचे

प्रमुख साधन,औद्योगिक विकास तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधार आहे .कृषी क्षेत्राचे हे महत्व लक्षात घेवूनच " अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन " हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दीष्टे: (Objective of Research)

1. अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
2. अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी यांच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी यांच्या उपभोग व राहणीमान प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
4. अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या रोजगाराचा अभ्यास करणे.
5. अल्पभूधारक शेतकरी यांच्या समस्येवर उपाय सूचविणे.

संशोधनाची गृहीतके: (Hypothesis of Research)

1. अहमदनगर व जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी यांच्या राहणीमानाचा दर्जा निम्न आहे.
2. अहमदनगर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यापेक्षा जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा उपभोगावरील खर्च अधिक आहे.

३. अल्पभूधारक शेतकरी आजही पारंपरिक पद्धतीने शेती करत आहेत.

४ . अहमदनगर जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यापेक्षा जालना जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती तुलनात्मक दृष्टीने चांगली आहे.

संशोधन पध्दती: (Research Methodology)

"अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन " या संशोधन कार्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आधार सामग्री (Primary Data) व दुय्यम आधार सामग्री (Secondary Data) अशा दोन्ही प्रकारच्या आधार सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

" अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन " करण्यासाठी दुय्यम आधार सामग्री मध्ये गॅझेटिअर, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, भारताची व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, विविध शासकीय प्रकाशने, शासकीय संकेतस्थळे, नियतकालिके, अध्ययन विषयाशी निगडीत असलेले संदर्भ ग्रंथ, अहवाल, संशोधनात्मक लेख, अप्रकाशित प्रबंध, अंक, मुखपत्र व विविध संगणकीय संकेत स्थळे इत्यादी साधनाचा उपयोग करण्यात येणार .

अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आधार सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी मुलाखत अनुसूची तयार करून या अनुसूचीद्वारे प्रत्यक्ष सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलाखती व निरीक्षण या आधारे प्राथमिक आधारसामग्री संकलीत करण्यात यणार आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी नमुना शेतकरी निवड करीत असतांना अहमदनगर व जालना जिल्हयातील प्रत्येक जिल्ह्यातील २० गावांची अशा एकूण ४० गावांची सहेतुक नमूना निवड पद्धतीने निवड केली जाणार आह. प्रत्येक गावातील ०५ शेतकरी या प्रमाणे एकूण २०० शेतकऱ्यांची सहेतूक नमूना निवड पद्धतीने निवड करण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या या २०० अल्पभूधारक शेतकरी यांची निवड करून प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात यईल.

प्रस्तुत संशोधनासाठी सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडा प्रमाण, वाढ व घट या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. तसेच वर्तुळालेख, स्तंभालेख इत्यादींचा वापर केलेला आहे. अशा प्रकारे प्राथमिक आधार सामग्री व दुय्यम आधार सामग्रीच्या आधारे अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन केले जाईल.

संशोधनाचा कालावधी: (Research Duration)

प्रस्तुत संशोधनासाठी २०१०-११ ते २०२०-२१ हा कालावधी निर्धारीत करण्यात आला आहे. मुलाखत-अनुसूची व प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे प्राथमिक आधार सामग्री संकलित करण्यात येईल. आणि अहमदनगर व जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन प्राथमिक आधार सामग्रीच्या आधारे करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation of Research)

खर्च व वेळेची मर्यादा लक्षात घेता संपूर्ण महाराष्ट्रातील सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्याऐवजी प्रस्तुत संशोधन कार्याची व्याप्ती ही अहमदनगर व जालना पुरती मर्यादित असून अहमदनगर व जालना जिल्ह्यातील प्रत्येक जिल्ह्यातून २० गावांची निवड केली जाईल. अशा एकूण ४० गावांच्या माध्यमातून २०० नमुना शेतकऱ्याकडून माहिती संकलित केली जाईल.

संशोधन साहित्याचा आढावा(Review of Resaerch)

नानावटी श्री. एम (१९५६)

यांनी 'रुरल लाईफ प्रॉब्लेम पर्सनल एक्सपिरिअन्स' या विषयावरील संशोधनपर लेखामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांची कारणीमिमांसा केली आहे. यांच्या मते अल्पभूधारक

शेतकऱ्यांच्या समस्या खूप गंभीर स्वरुपाच्या व विस्तृत आहेत. तसेच या समस्यांना काळजीपूर्वक हाताळण्याची गरज आहे. याशिवाय अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे कमी भांडवलसंचय असतो , मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारीपणा, जास्तीत जास्त सुविधा त्यांना ऊसनवारी करुन मिळवाव्या लागतात. या सर्व कारणामुळे त्यांच्या बचती या कमी असतात.

नायडू के. के, सिंग व्ही. (१९९०)

यांनी 'इम्पॅक्ट ऑफ डी. पी. ए. पी. ऑन सायको सोशल डायमेन्शन' या संशोधनपर लेखामध्ये तामिळनाडुमधील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व मानसिक वृत्तीवर अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमाच्या होणाऱ्या परिणामाचे मापन केले आहे. या अध्ययनात त्यांना असे दिसून आले की, ज्या सीमांत व अल्पभूधारक शेतकरी लाभार्थीच्या आर्थिक परिस्थितीत सुधार झाला आहे.

पाशा एस. ए. (१९९१)

यांनी 'सस्टेनॅबिलिटी अँड व्हायबिलीटी ऑफ स्मॉल अँड मार्जीनल फार्मर्सः ॲनिमल हस्बनडरी अँड कॉमन प्रॉपर्टी रिसोर्सेस.' या संशोधनपर लेखामध्ये त्यांनी असे स्पष्ट केले आहे की वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे ग्रामीण भागातील शेतजमीन अनेक लहान अनार्थिक धारणक्षेत्रामध्ये विभाजित होत आहे. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीपध्दती आणि त्यांच्याकडे असलेल्या साधनसंपत्तीचा वापर करताना पशुसंवर्धन महत्वाची भूमिका बजावतात.

एस. एन. साकोरे (२०००)

यांनी व ॲक्शन फॉर ॲग्रीकल्चरल् रिन्युअल इन महाराष्ट्र या संस्थेने 'कोरडवाहू अल्पभूधारक शेतीचे भवितव्य' या विषयावरील संशोधन अहवालात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास केला आहे. या संशोधन अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की, अध्ययन क्षेत्रात ६५ टक्के व्यक्ति शेतात काम करतात परंतु काम करणाऱ्या व्यक्तिबरोबर काम न

करणाऱ्या व्यक्तींचे गुणोत्तर 2:1 या प्रमाणात येते. यामुळे मिळालेले उत्पन्न विभागले जाते व आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होतो.

प्रकरणाची रुपरेषा

प्रकरण पहिले - प्रास्ताविक

प्रकरण दूसरे - संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

प्रकरण तिसरे – अहमदनगर व जालना जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण चौथे- शासनाच्या विविध योजणांचा आढावा

प्रकरण पाचवे - अल्पभूधारक शेतकरी यांची आर्थिक व सामाजिक स्थिती

प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची

वार्षिक नियोजन (अहवालाची योजना)- Scheme of Report

प्रस्तुत संशोधनासाठी तीन वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्याचे नियोजन पुढीलप्रमाणे

वर्ष	**संशोधन कार्याचे स्वरुप**
२०२४	प्राथमिक माहिती संकलन संशोधन साहित्याचे संकलन
२०२५	द्वितीयक माहिती संकलन व माहितीचे विश्लेषण
२०२६	माहितीची विश्लेनात्मक मांडणी संशोधन अहवाल लेखन व सादरीकरण

संदर्भ

1. डॉ.जे.व्ही. कायंदे- शेतीचे अर्थशास्त्र सिध्दांत आणि धोरण चैतन्य पब्लिकेशन, नाशीक, 2003

2. प्रा. मुकूंद गायकवाड- शेतीचा विकास काल-आज-उद्या, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे,2003.

3. डॉ. विजय कविमंडन- कृषि अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपुर, 1998

4. डॉ. जय. प्रकाश- मिश्र कृषि अर्थशास्त्र, साहित्यभवन पब्लिकेशन, आगरा, 2007.

5. डॉ. विजय कविमंडन -विकासाचे अर्थशास्त्र व नियोजन, मंगेश प्रकाशन, नागपूर, 1998.

6. डॉ. शं.के. मोडक-आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, 2005.

7. रुद्रदत्त, के. सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द कम्पनी (लि). दिल्ली, 2010

8. आर. के. बर्वे, मुकुंद महाजन इंडीयन इकॉनॉमी, निराली प्रकाशन, 2012.

9. भारताची आर्थिक पाहणी वित्त मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली,

10. डॉ. एम. एस. स्वामिनाथन. कृषि क्षेत्रातील गेल्या साठ वर्षातील उत्क्रांती, योजना, जानेवारी 2010, माहिती व प्रसारण मंत्रालय, दिल्ली,

11. प्रा. ज्ञानेश्वर मेघे, भारतीय कृषि अर्थशास्त्र, सेवा प्रकाशन,

12. राणे.ए.ए, देऊरखकर ए.सी इकॉनॉमीक्स ऑफ ॲग्रीकल्चर, अटलांटिक पब्लिशर्स, दिल्ली, 2007.

13. प्रा. दत्ताजीराव साळुंखे महाराष्ट्राची कृषि अर्थव्यवस्था, महाराष्ट्र विद्यापीठ

14. खेर. सी. पी.जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनुभव दिलीपराज प्रकाशन, पुणे.

संशोधक
गडपवार प्रियंका हनमंतराव
एम. ए. अर्थशास्त्र

मार्गदर्शक
डॉ. स्मिता कोंडेवार
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
कै. व्ही.के काळे वरिष्ठ
महाविद्यालय,नांदेड.